१ एप्रिल १९८७

महाराष्ट्र कष्टकरी आंदोलन समिती
व्दारा - रामभाऊ देशपांडे
महात्मा गांधी सेवामंदिर
२५२ स्वामी विवेकानंद मार्ग
वांद्रा, मुंबई ४०० ०५०

स्मरणपत्र

प्रिय साथी अनिल सरदार

स.नमस्कार

महाराष्ट्रात आदिवासी - दलीत - भटके - विमुक्त तसेच गरीबांमध्ये अनेक संघटना - गट गेली अनेक वर्षे काम करीत आहेत. ह्या संघटना । गटांनी आपापल्या भागात आपली प्रभावशक्ती उभी केली असली, तरीही व्यापक पातळीवर त्याचा आवश्यक तो प्रभाव निर्माण झाल्याचे दिसत नाही.

ह्या पार्श्वभूमीवर जमीन - जंगल - पाणी इ. सारख्या महत्वाच्या प्रश्नांवर काही समान कार्यक्रमाव्दारे एकत्रितपणे काम करावे म्हणून महाराष्ट्र कष्टकरी आंदोलन समिती संघटीत करण्यात आली. मात्र महाराष्ट्रभर काम करणाऱ्या अनेक संघटना - गटांपर्यन्त समितीला पोचता आले नाही. त्यादृष्टीने अशा संघटना - गटांनी एकत्र येऊन निश्चित भूमिका घेऊन समितीचे कामात सहभागी व्हावे. ह्या दृष्टीने सर्व कार्यकर्त्यांचे एक शिबीर ~~शनिवार, दिनांक १८ एप्रिल व रविवार~~

शनिवार, दिनांक १८ एप्रिल व रविवार, दिनांक १९ एप्रिल १९८७
रोजी हमालभवन, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे ४११ ००९, फोन ३५८४९

येथे आयोजित केले आहे. शिबीर दि. १८ रोजी १० वाजता सुरु होऊन दि. १९ ला संध्याकाळी ५ वाजता संपेल.

कार्यकर्त्यांची निवास - भोजनाची व्यवस्था समितीतर्फे केली जाईल. मात्र अंथरुण-पांघरुण सोबत आणावे. प्रवासखर्च प्रत्येकाने आपापला करावयाचा आहे.

आपले

नागेश हाटकर — निमंत्रक
रामभाऊ देशपांडे — निमंत्रक
महाराष्ट्र कष्टकरी आंदोलन समिती

टीप :

(१) ह्यापूर्वीचे निमंत्रणपत्र मिळाले नसल्यास हेच निमंत्रण समजून शिबीरास उपस्थित रहावे.

(२) गुलटेकडी-मार्केटयार्डसाठी पुणे स्टेशनहून बसेस सुटतात. तेथून हमाल भवनला यावे. तसेच पुणे स्टेशनहून स्वारगेट बसस्टॅण्डला उतरुन तेथून पायी किंवा रिक्षाने हमालभवनला यावे.

# महाराष्ट्र कष्टकरी आंदोलन समिती

## १४ फेब्रुवारी ८७ : बैठकीचा वृतांत

दि. १४ फेब्रुवारी १९८७ रोजी कशेळे, ता. कर्जत, जि.रायगड येथे महाराष्ट्र कष्टकरी आंदोलन समितीची बैठक झाली त्याचे इतिवृत्त.

श्री.नागेश हाटकर हयांनी प्रास्ताविकेत ही समिती स्थापन होण्यामागची पार्श्वभूमी सांगितली. दि. २० जुलै १९८६ रोजी म. क. आं. समितीची स्थापना झाल्यापासून आजपर्यन्तच्या कामाचा आढावा घेण्यात आला.

महाराष्ट्र कष्टकरी आंदोलन समितीने लिहिलेल्या भूमिकेचे वाचन होऊन ज्या संघटना, संस्था हया समितीत सामिल झालेल्या नाहीत, पण होऊ इच्छित आहेत त्यांनी सामिल व्हावे असे सांगण्यात आले.

गेल्या ६ महिन्यातील कामकाजाच्या आढाव्यावरुन संघटना मजबूतीचे प्रयत्न अधिक व्हायला हवे आहेत हयाची तीव्रता जाणवली. त्यासाठी अजित सरदार ( पश्चिम महाराष्ट्र ) दिनानाथ मनोहर ( खानदेश ) शेखर ( विदर्भ ) श्रीनिवास कुलकर्णी व शांताराम पंदेरे ( मराठवाडा ) हयांनी विभागवार प्रयत्न करण्याची जबाबदारी घेतली. त्यांना शरद कुलकर्णी, रामभाऊ देशपांडे, नागेश हाटकर व रमाकांत पाटील हे सहकार्य करतील.

महाराष्ट्र पातळीवर व्यापक बैठक दि. १८ व १९ एप्रिल १९८७ रोजी पुणे येथे होईल. सदर बैठक दि. १८ रोजी सकाळी ९ वाजता सुरु होऊन दि. १९ रोजी सायंकाळी ६ वाजता संपेल. हया बैठकीत प्रामुख्याने भूमिकेविषायी व पुढील आंदोलनात्मक कामाविषायी चर्चा होईल. हया बैठकीचे निमंत्रण रमाकांत पाटील व नागेश हाटकर पाठवतील.

जमिनीच्या प्रश्नांवर मंत्र्यांसोबत बैठक होऊन त्याचा पाठपुरावा करण्याचा प्रयत्न करावा.

महाराष्ट्र शासनाने आदिवासी जमिन हस्तांतरण कायद्यास दिलेल्या स्थगिती आदेशाचा निषोध करणारे पत्रक काढून विधानसभा व परिषादेच्या सदस्यांना आवाहन करावे व त्यास वृत्तपत्रातही प्रसिध्दी द्यावी. हे पत्रक शरद कुलकर्णी व नागेश हाटकर तयार करतील.

शेतमजुरांच्या किमान वेतन प्रश्नावर टिपण तयार करण्याची जबाबदारी विवेक पंडित व रजनिकांत हयांच्यावर सोपविण्यात आली आहे. एप्रिलमधील पुणे येथील बैठकीत ते मांडले जाईल.

महाराष्ट्र सुरक्षा दल विधेयकास आमचा विरोध कां ? हयासंबंधीचा दिनानाथ मनोहरांचा लेख सर्व संघटनां, संस्था यांना चर्चेसाठी पाठविण्याची जबाबदारी रमाकांत पाटील यांनी घेतली आहे.